६

# इतिहास अध्यापनात आधार पध्दतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**प्रा. सुनिता आ. लोंढे**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई.

अध्यापन कोणत्याही विषयाचे असो ते कोणत्या ना कोणत्या पध्दतीनेच करावे लागते. या पध्दती कधी विषयानुसार तर कधी कधीकधी एकाच विषयातील निरनिराळया आशयानुसारही बदलतात. यशस्वी अध्यापनाची कोणताही एकच एक मार्ग नसतो.यशस्वी अध्यापनाचे अनेक मार्ग असतात,त्यापैकी कोणत्या वेळी कोणती अध्यापन पध्दती वापरावी हे परिस्थितीनुरुप शिक्षकाने ठरविणे आवश्यक असते.

आधारांच्या साहाय्याने इतिहास लिहिला जातो. कारण इतिहास म्हणजे भूतकाळ. भूतकाळाचे वर्णन जेव्हा वर्तमानात केले जाते तेव्हा त्याच्या सत्यतेबद्दल नेहमीच प्रश्न उपस्थित केले जातात. हे खरे कशावरुन ? केवळ तुम्ही सांगता म्हणून ? केवळ पुस्तकात लिहिले आहे म्हणून ? त्यामुळे या प्रश्नांची उत्तरे इतिहासात दयावीच लागतात. ज्यांच्या तर्कशुध्द विचार प्रकाराचा विकास झालेला आहे. अशा सर्व विद्यार्थ्याच्या मनात असे प्रश्न उभे राहणार म्हणूनच ज्या आधारांच्या साहाय्याने इतिहास लिहिला जातो, ते आधारच जर अध्यापनासाठी वापरले तर इतिहासाचे अध्यापन जिंवत व्हायला मदत होईल. त्यासाठीच संशोधिकेने आधार पध्दतीव्दारे पाठ घेऊन या पध्दतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास प्रस्तुत लेखात केला आहे.

**संशोधनाची गरज**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद केलेल्या दहा गाभा घटकांपैकी अनेक घटक इतिहास विषयाशी अतिशय जवळचेआहेत. इतिहास विषयातून विद्यार्थ्याच्या अंगी राष्ट्रनिष्ठा, बंधुभाव, सर्वधर्मसमानता, आंतरराष्ट्रीय सांमजस्याची भावना इ. वृत्ती निर्माण करावयाच्या आहेत. या सर्व गोष्टी इतिहासातून यायच्या असतात. पण त्या तशा केव्हा येतील? जर इतिहासावर श्रध्दा असेल तरच, ही श्रध्दा तरी कशी विकसित होईल? जर इतिहासाची सत्यता पटली तर, ही सत्यता पटविण्याचे काम इतिहासातले आधार करतात. हे आधार ही केवळ घेतले वापरले असे होत नाहीत तर मिळालेला आधार कितपत खरा आहे, तो प्राथमिक आहे की, दुय्यम आहे. यच सर्वाचा विचार आधार वापरणाऱ्याला करावा लागतो. त्यासाठी शिक्षकाने वार्षिक नियोजन करताना इतिहासातील कोणत्या घटकांसाठी आधार उपलब्ध आहेत हे लक्षात घेऊन पूर्वतयारी करुन आधारांच्या साहयाने इतिहास अध्यापन केल्यास ते अधिक रंजक आणि जिवंत करणे शक्य होईल. या आधार पध्दतीचा विद्यार्थ्याच्या इतिहास विषयक अभिरुची व संपादन क्षमतेवर कसा अनुकूल प्रभाव पडतो हे तपासुन पाहण्यासाठी प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी गरज भासली.

**संशोधनाचे महत्व**

विद्यार्थ्यांना आधार पध्दतीचा परिचय होईल. इतिहासातील घटकांची सत्यता पडताळून पाहता येईल. अध्ययन अध्यापन प्रकियेत अभिरुची निर्माण होईल. विद्यार्थ्याच्या इतिहास विषयाच्या प्राप्तांकात सुधारणा होईल.

**समस्येचे विधान**

इतिहास अध्यापनात आधार पध्दतीच्या परिणामकारकेतचा अभ्यास करणे.

**कार्यात्मक व्याख्या**

**इतिहास:-** ज्या भूतकालीन घटना तद्नंतरच्य अनेक युगांत नोंद घेण्यासारख्या असतात, त्याचा वृत्तांत म्हणजे इतिहास होय.

**अध्यापन :-** विद्यार्थ्यांच्या मनात अध्ययन विषयक प्रेम चेतविणे म्हणजे अध्यापन होय.

**आधार पध्दती :-** प्राथमिक किंवा दुय्यम आधारांच्या साहाय्याने, लिखित किंवा अलिखित आधारांच्या साहयाने एखादा पाठयांश वर्गात शिकविणे म्हणजे अध्यापनाची आधार पध्दती होय.

**परिणामकारकता:-** परिणामकारकता म्हणजे विद्यार्थ्या मध्ये इतिहास विषयाच्या संपादनात होणारे बदल.

**संशोधन उद्दिष्टये:-**

१. व्याख्यान पध्दतीची आशयज्ञान संदर्भात परिणामकारकता अभ्यासणे.
२. विद्यार्थ्यांना आधाराची संकल्पना स्पष्ट करणे.
३. आधार पध्दतीची आशयज्ञाना संदर्भात परिणामकराकतेचा अभ्यास करणे.
४. व्याख्यान व आधार अध्यापन पध्दतीची विद्यार्थ्यांच्या इतिहास आशयज्ञान प्राप्तांकांच्या संदर्भात तुलना करणे.

**संशोधन परिकल्पना :-**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील शून्य परिकल्पना मांडली आहे.

इतिहास विषयाचे अध्यापन आधार पध्दतीने आणि व्याख्यान पध्दतीने केल्यास विद्यार्थ्यांच्या संपादनात कोणताही लक्षणीय फरक पडत नाही.

**न्यादर्श निवड :-**

प्रस्तुत संशोधनासाठी (भांडूप) मधील इयत्ता ९ वी तील ६० विद्यार्थी संख्या ही न्यादर्श म्हणून आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

शिक्षणशास्त्र विषयाच्या डी.एड. , बी.एड. तसेच बी.ए.बी.एड्. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व माध्यमातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी, सेवांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या सर्व प्रशिक्षणार्थीसाठी आणि इतिहास विषय शिक्षकांसाठी संशोधन विषयाची व्याप्ती आहे.

**मर्यादा :-**

१. आधार पध्दती पुरते हे संशोधन मर्यादीत आहे.
२. प्रस्तुत संशोधन भांडूप या शाळेतील इयत्ता ९वी तील ६० विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादीत आहे.
३. इयत्ता ९ वीच्या इतिहास विषयातील आधारास अनुकूल घटकांपुरतेच संशोधन मर्यादीत आहे.

**संशोधनाची कार्यपध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी भांडूप शाळेतील इयत्ता ९ ड१व ९ड२या वर्गाची निवड केली. हया विद्यार्थ्यांचे गट समान करण्यासाठी इयत्ता ८वी तील वार्षिक परीक्षेतील इतिहास विषयाच्या प्राप्तांकाचा विचार करुन दोन गटापैकी एक गट नियंत्रित व एक प्रायोगिक असे ठेवले. नियंत्रित गटास व्याख्यान पध्दतीने शिकविले व प्रायोगिक गटाला आधार पध्दतीने शिकविले व्याख्यान पध्दतीने शिकविण्यासाठी आणि आधार पध्दतीने शिकविण्यासाठी स्वंतत्र पाठ-टाचणे तयार केली. दोन्ही गटास एकाच शिक्षकाने एकच पाठयवस्तू शिकविली. प्रत्यक्ष अध्यापनानंतर उत्तर कसोटी दोन्ही गटाना देण्यात आली. मिळालेल्या प्राप्तांकाच्या आधारे मापिकेचा वापर करुन दोन्ही गटांची तुलना केली व परिकल्पनेचे परीक्षण केले.

**माहितीचे विश्लेषण:-**

उत्तर कसोटीतील प्राप्तांकाचेदोन्ही गटातील मध्यमान प्रमाण विचलन काढून मापिकेच्या आधारे परिक्षण केले. यात प्राप्त मूल्याचा विश्वासस्तर ०.५ होता तर नमुना ज मूल्याचा विश्वासस्तर ०.०१ इतका होता. प्राप्त मुल्य हे नमुना मुल्यापेक्षा जास्त होते. त्यामुळे प्राप्त मूल्य सार्थक ठरले.म्हणून प्रायोगिक गट व नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांच्या व्याख्यान पध्दतीने अध्यापन केल्यानंतर व प्रायोगिक गटातील आधार पध्दतीने अध्यापन केल्यानंतर प्राप्तांकात लक्षणीय फरक आढळत नाही या परिकल्पनेचा अस्विकार केलेला आहे.

**थोडक्यात :-** आधार पध्दतीने प्रायोगिक गटाच्या गुणांकात व्याख्यान पध्दतीच्या गुणांकापेक्षा लक्षणीय फरक आढळला.



Vol:1st , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2013,ISSN : 2319-5525

**निष्कर्ष:-**

१. इतिहास विषयासाठी आधार पध्दती परिणामकारक आहे.
२. आधार पध्दतींच्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यांच्या आशया ज्ञानामध्ये वाढ होते.
३. नेहमीपेक्षा वेगळया पध्दतीने अध्यापन केल्यामुळे अध्ययन अध्यापनात नाविन्यता येते.
४. या अध्यापन पध्दतीच्या अध्यापनामुळे सलग व सखोल आशयज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त होते.
५. आशयज्ञान व अभिरुचीचा दर्जा सुधारतो.

**शिफारशी:-**

१. या अध्यापन पध्दती मोठया न्यादर्शावर राबवून निष्कर्षाचे सामान्यीकरण करता येईल.
२. अन्य इयत्तांना सुध्दा अशा प्रकारे अध्यापन करुन त्यांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.
३. अन्य विषयांचा अध्यापनात दोन अध्यापन पध्दतींनी अध्यापन करुन त्यांच्या परिणामकारकतेचा तौलनिक अभ्यास करता येईल.

**संदर्भग्रंथ:-**


१. पंडित ब. वि. (२००६) शिक्षणातील संशोधन, नित्य नूतन प्रकाशन, पुणे३०.
२. कदम व चौधरी (२००१) शैक्षणिक संख्याशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर
३. भिंताडे वि. रा. (२००६) शैक्षणिक संशोधन पध्दती नित्य नूतन प्रकाशन, पुणे-३०
४. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ छापील साहित्य (आधारपध्दती).


• • •


**Sanshodhan Chetana**
Membership Form

Name : ____________________

Designation : ____________________

Residential Address : ____________________
____________________
____________________

Name & Address of the Institution : ____________________
____________________
____________________

Phone No. : ____________________

E_mail : ____________________

Mob. : ____________________

Signature




Vol:1st , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2013,ISSN : 2319-5525